आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ जून २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १११व्या भागात येत्या ३० जूनला साधणार श्रोत्यांशी संवाद

- जम्मू - काश्मीरमधल्या सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक सुरू

- वंदे भारत रेल्वे गाड्यांमध्ये पुढील दोन महिन्यात शयनयान कक्षाची चाचणी घेण्यात येणार

- १८व्या मिफ चित्रपट महोत्सवात डॉक फिल्म बझारचं उद्घाटन

**आणि**

- भारतीय टेनिसपटू सुमित नागलचा पेरुगिया चॅलेंजर्स स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १११व्या भागात येत्या ३० तारखेला देशवासियांशी संवाद साधणार आहेत. सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मोदी यांचा 'मन की बात'चा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा मायगव्ह खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

'मन की बात' कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून आकाशवाणी वृत्त विभागाच्या संकेतस्थळावरून आणि न्यूज ऑन एअर मोबाईल वरून प्रसारित केला जाईल. आकाशवाणी वृत्त विभाग, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यू ट्यूब वाहिन्यांवरून कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. कार्यक्रमाच्या हिंदी प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमधला अनुवाद प्रसारित होईल.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमधल्या सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक सुरू आहे. जम्मू -काश्मीरमध्ये अलिकडे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तिथल्या सुरक्षा स्थितीचा आढावा या बैठकीत घेण्यात येत आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय गृह सचिव अजय भल्ला या बैठकीला उपस्थित आहेत. गुप्तचर विभागाचे संचालक, लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे, नवनियुक्त लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे महासंचालक, मुख्य सचिव, जम्मू- काश्मीरचे पोलीस महासंचालक आणि इतर वरिष्ठ अधिकारी देखील या बैठकीला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

काश्मीरमधल्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी नागरी आणि पोलीस प्रशासनाने सुरक्षा संस्थांशी समन्वय साधत काम करावं असे निर्देश जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिले आहेत. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल श्रीनगरमध्ये उच्चस्तरीय बैठक घेतली. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या कोणत्याही संस्थांची गय करू नका अशा सूचना सिन्हा यांनी यावेळी दिल्या. अमरनाथ यात्रा, योग दिवस आणि ईद निमित्त जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी केलेल्या तयारीचा आढावाही नायब राज्यपालांनी या बैठकीत घेतला. तसंच यात्रेच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन, रस्त्याची दुरुस्ती आदी बाबींवरही चर्चा केली.

**<><><><><>**

वंदे भारत रेल्वे गाड्यांमध्ये पुढील दोन महिन्यात शयनयान कक्षाची चाचणी सुरू होईल, अशी माहिती  रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत दिली. सध्या वंदेभारत मध्ये केवळ बसण्याची व्यवस्था उपलब्ध आहे. वंदेभारतमध्ये शयनयानाची मागणी प्रवाशांकडून होत असल्याचं वैष्णव म्हणाले. गेल्या दहा वर्षात ३५ हजार किलोमीटर रेल्वेमार्गाचं जाळं निर्माण करण्यात आलं असून कमी उत्पन्न गटाच्या प्रवाशांनाही आरामदायी प्रवास-सोयी उपलब्ध करुन देण्याकडे आपण लक्ष देत असल्याचं त्यांनी सांगितलं. अमृत भारत रेल्वेच्या उत्पादनवाढीचं काम वेगात सुरु असल्याची माहितीही वैष्णव यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेच्या नावे लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आणखी एका विक्रमाची नोंद झाली आहे. विविध ठिकाणी सार्वजनिक कार्यक्रमात अधिकाधिक लोकांच्या सहभागासाठी ही नोंद झाली आहे. रेल्वेने गेल्या २६ फेब्रुवारीला विविध

दोन हजार ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं त्यात ४० लाख १९ हजार लोक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, रेल्वे पादचारी पुलांचं उद्घाटन तसंच नव्या रेल्वेस्थानकांची पायाभरणी करण्यात आली होती.

**<><><><><>**

आंतराष्ट्रीय योग दिवस २१ जून ला आहे. त्याच्या पूर्वतयारीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी योगासन करतानाचा आपला व़्हिडिओ समाजमाध्यमावर अपलोड केला आहे. या व़्हिडिओसोबतच इंग्लिश आणि हिंदी भाषेत आसन कसं करावं याबाबत माहिती तसंच आसन केल्याने होणारे आरोग्यविषयक लाभ सांगितले आहेत.

**<><><><><>**

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज दुसरा दिवस आहे. यंदा पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या डॉक फिल्म बझारचं उद्घाटन आज झालं. याबद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.

**व्हाईस कास्ट (४६ सेकंद)**

*दिल्ली क्राइम या गाजलेल्या वेबसीरीजच्या निर्मात्या आणि एमी पुरस्कार विजेत्या अपूर्वा बक्षी यांनी नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या प्रांगणात मिफच्या डॉक फिल्म बझार या माहितीपट प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार आणि पत्रसूचना कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स-शर्मा यावेळी उपस्थित होत्या. नवोदित माहितीपट निर्मात्यांना आपलं काम वरिष्ठ निर्मात्यांना दाखवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या डॉक फिल्म बझारचा उद्देश आहे. मिफमध्ये आज विविध माहितीपट, लघुपट,*

*ॲनिमेशनपट दाखवण्यात येत आहेत. तसंच चित्रपटांशी संबंधित विविध विषयांवरची मार्गदर्शनपर सत्रं, चर्चासत्रंही नॅशनल सेंटर फॉर पर्फोर्मिंग आर्ट्स इथं होत आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.*

**<><><><><>**

राज्यशासन अधिकारी महासंघाच्या मागण्यांबद्दल राज्यशासन सकारात्मक असून त्याबद्दल लवकर निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती अधिकारी महासंघाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सेवानिवृत्तीचं वय साठ वर्षे करावं, केंद्राच्या धर्तीवर महागाई भत्त्यात वाढ, अतिरिक्त सचिव पदाची निर्मिती तसंच रिक्त पदांची भरती, सुधारित सेवानिवृत्तीची अधिसूचना काढावी इत्यादी महासंघाच्या मागण्या आहेत. आचारसंहितेमुळे प्रलंबित राहिलेल्या या मागण्यांवर तातडीनं निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत शुक्रवारी चर्चा झाल्याची माहिती अधिकारी महासंघाने या पत्रकात दिली आहे.

**<><><><><>**

संयुक्त अरब अमिरातीमध्ये आज ईद अल अजहा अर्थात बकरी ईदचा सण साजरा केला जात आहे. या निमित्त विशेष नमाज अदा करण्यात आली. इस्लामने सांगितलेल्या हज यात्रेचं आयोजनही बकरी ईदच्या वेळी होतं. प्रेषित इब्राहिम यांनी केलेल्या सर्वोच्च त्यागाचं स्मरण करण्यासाठी मुस्लिम समाज हा सण साजरा करतो. सौदी अरेबिया इथं मक्केपासून जवळ मुझदलिफा इथं १८० देशातले जवळपास १५ लाखांहून अधिक यात्रेकरू जमले आहेत. हिजरी दिनदर्शिकेच्या १२ व्या आणि अंतिम महिन्यात येणाऱ्या या सणाला विशेष महत्त्व आहे.

**<><><><><>**

गाझा पट्टीतल्या हमास संघटनेने काल रफाहमध्ये केलेल्या हल्ल्यात इस्त्रायलच्या आठ सैनिकांचा मृत्यू झाल्याचं इस्त्रायलच्या लष्कराने सांगितलं आहे. रफाहच्या अल सुल्तान या भागात हा हल्ला करण्यात आला. यानंतर हमासच्या रफाह ब्रिगेडला हरवणं आपल्यासाठी आवश्यक असल्याचं इस्त्रायली लष्कराचे प्रवक्ते रियर एड. डेनियल हगारी यांनी म्हटलं आहे. गेल्या सात महिन्यांपासून इस्त्रायल आणि हमासमध्ये युद्ध सुरू आहे.

**<><><><><>**

भारतीय टेनिसपटू सुमित नागल याने बनार्बे जपाटा मिरालेस या स्पेनच्या टेनिसपटूला हरवून पेरुगिया चॅलेंजर्स स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. दुहेरीच्या अंतिम फेरीत मात्र भारताचा एन श्रीराम बालाजी आणि जर्मनीच्या आंद्रे बेगेमॅन या जोडीला अर्जेंटिना आणि मेक्सिको यांच्या टेनिसपटू जोडीपुढे हार पत्करावी लागली.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने स्कॉटलंडवर पाच गडी राखून मात केली आहे. पहिल्यांदा फलंदाजी करताना स्कॉटलंडच्या संघाने वीस षटकात पाच गड्याच्या बदल्यात १८० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने आपले पाच गडी गमावले. पण, शेवटच्या षटकातले दोन चेंडू शिल्लक असताना १८६ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केलं. दरम्यान, काल भारत आणि कॅनडा संघादरम्यानचा सामना पावसामुळे रद्द झाला.त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने नामिबियाचा डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे ४१ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**

सिक्किममध्ये मुसळधार पावसामुळे आणि दरड कोसळल्याने अडकलेल्या बाराशे पर्यटकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु असून, मंत्री शेरिंग भुतिया स्वतः रस्ते आणि हवाई मार्गाने पर्यटकांच्या बचावकार्यावर लक्ष ठेवून आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विविध विभाग तसंच स्थानिक रहिवाशांच्या मदतीने बचाव कार्य सुरू आहे. मुख्यमंत्री प्रेसिंग तमांग यांनी मेल्लीबाजारला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाचा आढावा घेतला. तसंच पाटबंधारे विभागाशी प्रतिबंधात्मक उपायांबाबत चर्चाही केली. पावसाळ्यानंतर कायमस्वरुपी पूरनियंत्रण भिंत बांधणार असल्याचे पाटबंधारे विभागाने सांगितलं आहे. सिक्किममधले रस्ते आणि पूल विभाग आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांच्यादरम्यान काल झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत, राष्ट्रीय महामार्ग दहावर येणाऱ्या अडथळ्यांविषयी चर्चा करण्यात आली.

**//<><><><><>//**